# प्रवरा हरित पट्ट्यात दोनशे बिबटे

## विद्या आत्रेय यांचा अंदाज; 'प्रोजेक्ट वाघोबा डॉट इन'चे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

अकोले, ता. १४ : रुंभोडी ते श्रीरामपूर या 'प्रवरा हरित पट्ट्या'त २०० च्या आसपास बिबटे असावेत, असा अंदाज वन्य प्राणी व बिबट्या निरीक्षक विद्या आत्रेय यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

जुन्नर तालुक्यात २००३ मध्ये बिबट्याने ५० जणांवर हल्ला केला होता. तेव्हा 'संघर्ष'साठी काम सुरू करणाऱ्या श्रीमती आत्रेय यांनी नंतर २००८ पासून 'काटी' या पुणेस्थित वन्य पशुनिरीक्षणाचे काम सुरू केले. तब्बल तीन वर्षांचे निरीक्षण त्यांनी 'प्रोजेक्ट वाघोबा डॉट इन' याद्वारे काल ध्वनिचित्रफितीद्वारे प्रकाशित केले. तेव्हा त्यांनी पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधला.

त्या म्हणाल्या, की इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (बेंगळुरू) या संस्थेने यासाठी केलेले अर्थसाह्य देशात भ्रमंती करण्यास व जंगल तुडवण्यास उपयुक्त ठरले. कॅमेरा ट्रॅपिंगद्वारे (१०० चौ. कि. मी.) अकोले-संगमनेर परिसरात मोठे १२ व लहान २० बिबटे आढळले. ४० कॅमेऱ्यांमध्ये ९० बिबटे, ९० तरस छायाचित्रणात आले, तर विष्ठेच्या विश्लेषणानुसार ६० टक्के कुत्री, ३० टक्के शेळ्या, मेंढ्या, वासरे आणि एक टक्का जंगली ऊद, मुंगूस, घूस असे बिबट्यांचे खाद्य असल्याचे आढळले. अकोल्यासारख्या शहर परिसरातील बिबट्यांच्या विष्ठेत ४० टक्के डुकरांचे पाय, डोकी, केस आढळले.

### अकोले तालुक्यात पट्टेरी वाघ

**अकोले तालुक्यातील अभयारण्यात पट्टेरी वाघ आहे. बिबट्यांमध्ये बहीण, भाऊ, आई, वडील या नात्याची जाणीव असते. एक बिबट्या व तीन माद्या एकाच वेळेस एकत्र वावरताना आढळतात, असे आत्रेय यांनी सांगितले.**

शहराजवळील बिबटे सुस्त व आळशी आढळले, तर जंगलातील बिबटे मात्र चपळ आढळले. 'बंदिस्त' बिबट्याचे सरासरी आयुर्मान २० ते २५ आणि जंगली बिबट्याचे आयुर्मान १० ते १२ वर्षे आहे; मात्र जंगली बिबट्याचा मृतदेह सहसा आढळून येत नाही, अशी माहिती त्यांनी पुरविली.

बिबट्या माणसावर कधीच हल्ला करीत नाही. त्याला १०० किलोमीटर अंतरावर सोडले तरी तो परततो. तो भक्ष्यप्राप्तीनंतर सात दिवस अन्नाविना राहतो. आपल्या मूळ ठिकाणी परतताना त्याच्यावर हल्ला झाला, तर तो बचावासाठी प्रतिहल्ला करतो, असे सांगून घरातील कुत्रा किंवा मांजरीप्रमाणे त्याचे वास्तव्य असते, हे आपण सर्वांनी स्वीकारले, तर बिबट्या-माणूस संघर्ष संपेल, अशी पुस्ती त्यांनी जोडली.

पाच बिबट्यांना 'चीप' बसवल्या होत्या असे सांगताना, त्यांनी शेपटाकडे बसवली जाणारी (भूल देऊन) रीडर चीप कमी किमतीची असते तर गळ्याला बांधली जाणारी चीप ही किमान दोन लाख रुपये किमतीची असते व त्याचे जोड सॅटेलाईटशी असल्याने त्याचा ठावठिकाणा कळण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. गाव व परिसर स्वच्छ ठेवा, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, झळ पोचलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई ग्रामपंचायत पातळीवर अधिकार देऊन तातडीने दिली जावी, नुकसान भरपाई निधीसाठी विशेष तरतूद केली जावी, अशा सूचना त्यांनी केल्या.